# छात्र प्रबोधन

सौर ज्येष्ठ, शके १९४५ । वर्ष २३ अंक ९।
(प्रारंभापासूनचा अंक क्रमांक – वर्ष ३१ अंक ११)
वार्षिक वर्गणी ₹ २५०। मूल्य ₹ २५। पृष्ठे २८

ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी,
कृतिशीलता जोपासणारे मासिक!





# हसरी शतवर्षे जयगान

उन्नत आत्मा, प्रसन्न मानस, शरीरही बलवान्
श्रवणवचन दृष्टीसह हसरी शतवर्षे जयगान,
हसरी शतवर्षे जयगान ।। धृ. ।।

समग्र रूचकर चौरस देशी हितकर नित्याहार
स्वयंश्रमाने देह चपळ अन् बळकट जे करणार
कुपथ्य चंगळ व्यसनांनी नच बाधित पंचप्राण ।। १ ।।

मैत्री करुणा मोद उपेक्षा शम दम मृदु उद्‌गार
सुखमय सहजीवन जनगणही जिवापार जपणार
प्रांजळ निर्भय निर्णायक मन संतत नवनिर्माण ।। २ ।।

हसत, गात, नवकल्प रचित जे सकलांसह जगणार
विश्वाच्या कर्त्याधर्त्याशी तन्मय जे होणार
नव्या पिढीचे नित्य जयिष्णू सर्वलोकसन्मान ।। ३ ।।

– प्रा. राम डिंबळे

या पद्याची
चाल ऐका
आणि पद्य म्हणा!

**पद्याचा भावार्थ :** तुमचे शरीर निरोगी, मन प्रसन्न, आत्मा शुद्ध असेल आणि आपल्या सर्व इंद्रियांचा नाक, कान, डोळे, जिव्हा आणि त्वचा यांचा सहजपणे चांगला उपयोग केला, तर तुम्हाला आनंदमय असे दीर्घायुष्य लाभेल.

असे अर्थपूर्ण दीर्घायुष्य व्यतीत करण्याचा मंत्र, प्रस्तुत पद्यात सांगितला आहे. आपले पारंपरिक, रुचकर, चौरस भोजन घेतले, स्वत: व्यायाम करून बळकट, चपळ देहयष्टी मिळवली, वाईट व्यसने, वाईट कृत्ये यांच्या आहारी गेलो नाही तर असे आनंदमय दीर्घ आयुष्य नक्कीच लाभेल.

केवळ शरीर सतेज, सुंदर असून उपयोग नाही; तर मैत्री, करुणा, दया अशा सद्‌गुणांची कास धरायला हवी. कुणाची उपेक्षा करू नये. वाणी मृदू असावी; एकमेकांशी सहज मैत्रीपूर्ण संवाद जपावा. मात्र आपले प्रामाणिक विचार निर्भयपणे मांडावेत, सतत नावीन्याचा ध्यास मनाला असावा, असे झाले तर लाभलेले दीर्घायुष्य आनंददायी असेल.

नवनिर्माणाची आस धरून, जे समाजातील सर्वांना बरोबर घेऊन आपले जीवन व्यतीत करतील, आपल्या कृतीने परमेश्वराशी जे तादात्म्य पावतील, त्यांना नेहमीच यश प्राप्त होईल. नव्या पिढीचे ते पाईक ठरतील. समाजात त्यांना मानसन्मान मिळेल. त्यांचे समृद्ध असे जीवन स्वत:च्या व इतरांच्या नजरेत स्मरणीय, गौरव करण्यासारखे होईल.

ॐ

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

# छात्र प्रबोधन


**सौर ज्येष्ठ, शके १९४५। वर्ष २३ अंक ९**

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४/ऑगस्ट १९९२
एकूणात ३७१ वा अंक, वर्ष ३१ अंक ११)

प्रकाशन दिनांक – सौर ११ ज्येष्ठ, शके १९४५/१ जून २०२३


## अंतरंग


२. पद्य... **हसरी शतवर्षे जयगान*** – राम डिंबळे

४. **संवाद** – शिल्पा कुलकर्णी

५. कथा... **भिमू शक्तिमानचा पूल!*** – भारत सासणे

११. ललित... **गोष्ट एका पुस्तकाची आणि पुरस्काराची** – मल्हार अरणकल्ले

१३. कविता... **वारी** – नेहा लिंबकर

१४. **माझे संकल्प माझ्या नोंदी**

१६. लेखमाला... **गप्पा आपल्या देशाच्या! – ६**
**आसाम–'त्यांचा पराक्रम आमचाच पराक्रम!'** – आशुतोष बारमुख

१९. चित्रपट परिचय... **न्यूटन*** – शैलजा देशमुख

२३. लेखमाला... **घेऊ प्रेरणा निसर्गापासून – लेखांक २**
**किमया चोचीची!** – डॉ. नंदा हरम

२७. **छात्र प्रबोधनद्वारा नव्याने प्रकाशित पुस्तके**

**याशिवाय :** आनंदवार्ता* (१०), वर्गोद्दिष्ट स्पर्धा*, काव्यकोडी, प्रतिसादी वाचकवीर (२६)


**पानांखालील ओळी :** काव्यपंक्ती - शाळेविषयी...
**माहितीपर** - भारतातील पर्यावरण क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या व्यक्ती

**अवश्य वाचा... पाहा... ऐका...** ✲ **या लेखांना QR कोड दिले आहेत ते स्मार्टफोनवर स्कॅन करा.** त्यासाठी गुगल प्ले स्टोअरवरून QR code scanner मोफत डाऊनलोड करा.

**मुखपृष्ठाविषयी :** निसर्गाची ओढ, त्याचा सहवास यामधली मौज लुटतानाची मुलं, तसंच पाऊण सुट्टी सरली आहे आणि शाळा सुरू होण्याची उत्सुकता, कुतूहल हे देखील मुलांच्या चेहऱ्यावर दिसू लागले आहे. हे या मुखपृष्ठातून दाखवले आहे.

**– सायली कुलकर्णी**


**संपर्क पत्ता :** छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०) २४२०७१७४/१७५ **संकेतस्थळ :** www.chhatraprabodhan.org
**इ-मेल :** chhatraprabodhan@jnanaprabodhini.org


**छात्र प्रबोधन युट्यूब चॅनेल लिंक – सभासद व्हा!**
https://youtube.com/@user-rk8py6zj7f


या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतील असे नाही.



**संपादक, प्रकाशक, मुद्रक**
महेन्द्र सेठिया

**मानद संपादक :** शैलजा देशमुख

**संपादक मंडळ**
वाच. कांचनगंगा गंधे,
आश्लेषा महाजन, स्वाती ताडफळे,
मल्हार अरणकल्ले

**कार्यकारी संपादक**
शिल्पा कुलकर्णी

**साहाय्यक कार्यकारी संपादक**
वैशाली दीक्षित

**मुखपृष्ठ** – सायली कुलकर्णी

**आतील चित्रे** – सायली कुलकर्णी
राहुल देशपांडे, चित्रांजली

**छात्र प्रबोधन मासिकाची वर्गणी**
**वार्षिक :** ₹ २५०, **द्वैवार्षिक :** ₹ ५००,
**त्रैवार्षिक :** ₹ ७००,
**दशवार्षिक :** ₹ २२००,
**इ-अंक वार्षिक वर्गणी :** ₹ १००
**या अंकाची किंमत :** ₹ २५/-
घरपोच दिवाळी अंकासाठी प्रतिवर्षी ₹ ५० जादा


**पुस्तकांच्या ऑनलाइन खरेदीसाठी व मासिकाच्या ऑनलाइन सभासद नोंदणीसाठी**
**jpprakashane.org**
या संकेतस्थळाला भेट द्या!!

चेक/डी.डी. 'ज्ञान प्रबोधिनी' अथवा 'Jnana Prabodhini' याच नावाने काढावा. सोबतच्या क्यूआर कोडद्वारे ऑनलाइन/NEFT ने वर्गणी भरल्यावर 'छात्र प्रबोधन'ला मेल करून त्याचे तपशील कळवा.

SCAN HERE TO PAY
WITH ANY BHIM UPI APP
JNANA PRABODHINI

**छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे...! विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ!!**

वार्षिक देणगीदार – ➢ श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे ➢ श्री. अनिल पालकर, सातारा ➢ श्री. सतिशचंद्र गोरे, पुणे ➢ डॉ. विकास हरताळकर, हरताळकर हॉस्पिटल, चोपडा, जि. जळगाव ➢ श्री. अनिरुद्ध शहापूरकर

# संवाद

**प्रिय प्रबोधकांनो,**

कशी गेली तुमची उन्हाळी सुट्टी? आता नव्या शैक्षणिक वर्षाचे स्वागत करायला तुम्ही सगळे उत्सुक, आतुर झाला असाल, हो ना! पाठ्यपुस्तके, वह्या, दप्तर, गणवेश यांच्या खरेदीत दंग झाला असाल. नवीन वर्षात पाठ्यपुस्तकात कोणते पाठ शिकायला मिळणार आहेत, त्याबद्दलचे कुतूहल वाटत असेल! सुट्टीत घेतलेले अनोखे, वेगळे अनुभव वर्गमित्र-मैत्रिणींना भेटून कधी एकदा सांगतो असं तुम्हाला झालं असेल! तुमच्या मित्र-मैत्रिणींनी सुट्टीत कोणते छंद जोपासले, कोणते नवीन अनुभव घेतले ते देखील जाणून घ्या. जे अनुभव तुम्हाला भावले, त्याबाबत मित्रमैत्रिणींना दाद द्या. त्यातील एखादी गोष्ट शिकाविशी वाटली, तर तसे वहीत नोंदवून ठेवा.

शालेय अभ्यासक्रमाबाबतच्या तुमच्या प्रगतीचा तपशील तुम्हाला एका ठरावीक दिवशी प्रगती-पुस्तकाद्वारे दिला जातो. शिक्षकांद्वारे केलेल्या अभ्यासाबाबतच्या तुमच्या प्रगतीच्या नोंदी तुमच्याकडे राहतात; पण अभ्यासक्रमापलीकडच्या तुमच्या प्रगतीच्या नोंदींचं काय? त्या प्रगतीचा ताळेबंद तुमचा तुम्हाला मांडता येईल का? मी फारच कोड्यात बोलतेय असं वाटतं का तुम्हाला? थांबा, सविस्तरच सांगते!

समजा, एकट्यानं कुठंही बाहेर जायची तुम्हाला सतत भीती वाटत राहाते; पण यावर्षी त्या भीतीवर मात करत सुट्टीत तुम्ही एकट्यानं प्रवास करून नातेवाईक/मित्रमंडळींना भेटायला गेला असाल, त्यामुळे तुमचा आत्मविश्वास चांगलाच उंचावला असेल. त्या बळावर पुढे 'अगदी अनोळखी ठिकाणी पण एकट्याने भटकंतीला जाऊ,' असा निश्चय तुम्ही केलात: तर ही तुमची प्रगतीच्या दिशेने केलेली वाटचालच आहे. एखाद्या गोष्टींवर मागचा पुढचा विचार न करता, पटकन प्रतिक्रिया द्यायचा एखाद्याचा स्वभाव असतो; पण या स्वभावाचे तोटे लक्षात घेऊन 'विचारपूर्वक' प्रतिक्रिया देण्याची सवय अंगी बाणवण्याचा प्रयत्न करायला लागलात, तर तुम्ही प्रगतीपथावरच आहात. स्वत:मधील मर्यादांवर मात करत, स्वत:मध्ये सकारात्मक बदल घडवत, आहे तिथून एक पाऊल ठरवून पुढं जाणं म्हणजे 'प्रगती' करणं!

अभ्यासापलीकडील अशी प्रगती या शैक्षणिक वर्षात तुम्हाला ठरवून करता येईल का? उदा. स्वभावात सकारात्मक बदल करणं, शालेय स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवणं, अवांतर वाचन करणं, कौशल्यं मिळवणं, पर्यावरणपूरक कृती करणं, वेगवेगळे अनुभव घेणं इत्यादी. या यादीत तुम्ही कितीतरी भर घालू शकाल.

अभ्यासाबरोबरच विविध अनुभव घेत, कृती करत, आपण खऱ्या अर्थाने 'मोठ्ठे' होत असतो. असं **'मोठ्ठं' होण्यासाठीचे संकल्प स्वत:हून ठरवून पूर्ण केले, तर त्यातून मिळणारा आत्मविश्वास आणि आनंद मोठा असतो!** असे काही 'कृती-संकल्प' तुम्हाला अंकातील पान क्र.१४-१५ वर दिले आहेत, ते पाहा. त्यातले कोणते संकल्प या वर्षात करायचे, ते आत्ताच ठरवून टाका!

गेले महिनाभर छात्र प्रबोधनच्या **'ऐपावाक'** (ऐका-पाहा-वाचा-करा) उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या कृती करत अनोखे अनुभव घेतले. महिनाभर दर्जेदार साहित्य ऐकलं-वाचलं, चित्रफिती पाहिल्या. त्या सर्वांसाठी तोरणा गडावर 'धम्माल सहल' या महिन्यात आयोजित केली आहे. धडपडणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी **'प्रबोधन विकासिका' हा वार्षिक उपक्रम देखील सुरू झाला आहे.** तपशील पान क्र.२२ वर दिले आहेत. त्यातील पहिली प्रत्यक्ष 'कौशल्य कृती कार्यशाळा' २५ जूनला आहे. या उपक्रमात सहभागी झाला आहात ना? नसाल तर लगेच jpprakashanc.org वरून आजच नोंदणी करा!

**अभ्यासाबरोबरच विविध अनुभव घेत, कृती करत 'मोठ्ठं' होण्यासाठीचे तुम्ही केलेले संकल्प पूर्णत्वाला जाण्यासाठी तुम्हाला अनेक शुभेच्छा!**

तुमची,
**शिल्पाताई**

माहिती मिळवा : अनिल अग्रवाल - पर्यावरण आणि विकासातील कार्याबद्दल भारत सरकारतर्फे पद्मश्री आणि पद्मभूषण.

वार्षिक देणगीदार - ➢ वाच. अजित कानिटकर, पुणे ➢ श्री. प्रसाद सांडभोर ➢ सौ. सुचेता सोनी ➢ सौ. वृषाली दिलीप अदवंत, पुणे ➢ सौ. स्मिता चावरे, ऐरोली, नवी मुंबई ➢ सौ. रजनी सोहनी, पुणे

# भिमू शक्तिमानचा पूल

– भारत सासणे

भिमूच्या मावसभावाने त्याला आपल्या गावी येण्याचं निमंत्रण दिलं. भिमू यापूर्वी तिकडे कधीच गेला नव्हता. ग्रामीण भाग त्याला अपरिचित नसला, तरी अगदी दुर्गम अशा खेड्याला भिमूनं कधी भेट दिली नव्हती. त्याच्या वडिलांनी त्याला जायची परवानगी दिली. आणि म्हणाले,

''ज्यांना जीव मुठीत धरून दररोज शाळेत जावं लागतं असे कितीतरी विद्यार्थी आपल्या भारतात आणि महाराष्ट्रात आहेत...''

''म्हणजे काय?'' भिमूनं आश्चर्यचकित होऊन विचारलं.

त्यावर वडिलांनी भिमूला जे सांगितलं त्याचं सार थोडक्यात पुढीलप्रमाणे...

१

'कितीतरी दुर्गम अशा गावांना नदीच्या आणि समुद्राच्या पाण्याचा वेढा पडतो. पण तिथले विद्यार्थी शाळेत जायचं सोडत नाहीत. कधी तराफ्यावरून, कधी होडीमधून हे विद्यार्थी दररोज शाळेला जातात. कित्येक ठिकाणी उंच-सखल रस्ते आहेत आणि तुटके पूल आहेत. जंगलातल्या वाटासुद्धा आहेत. अनेकदा तिथं जंगली श्वापदं हिंडत असतात; पण अशाही परिस्थितीमध्ये खेड्यातल्या आणि दुर्गम भागातल्या मुलांना शाळेत जावं लागतं. शाळा घरापासून कित्येक किलोमीटर दूर असते. तरीही हे विद्यार्थी जिद्दीने शाळेत जातात; कारण त्यांना शिकायचं असतं.'

भिमूला हे सर्व ऐकून आश्चर्य तर वाटलंच; पण या मुलांचा अभिमानही वाटला. तो म्हणाला,

''खरंच?''

''तुझ्या मावसभावाकडे–शिवाकडे तू जाणारच आहेस ना?... मग बघ स्वतःच!...''

नवल करीत भिमू आपल्या मावसभावाच्या गावाकडे जायची तयारी करू लागला.

२

मावसभावाच्या गावाचं नावच डोंगरपूर. अगदी दूर, तालुक्यापासून दूर आणि दुर्गम भागातलं हे गाव ! डोंगरपूरला जायचा रस्ता उंच-सखल, डोंगरा-डोंगरातला, जंगलातला असा होता. एकच एस.टी. बस तिथं जायची. भिमू या बसनं प्रवास करीत निघाला.

इतका दुर्लक्षित आणि





वार्षिक देणगीदार – ➢ श्री. मिलिंद संत, संतुल, पुणे ➢ श्री. अनिल नेसरी, भूगाव, पुणे ➢ श्री. श्रीपाद कुलकर्णी, नाशिक
➢ श्री. विनय गडीकर, पुणे ➢ श्रीमती आरती अजित पटवर्धन, पुणे ➢ श्री. शशांक चांदोरकर, पुणे

उपेक्षित असा भाग भिमू पहिल्यांदाच पाहात होता.

आधी कळवलं असल्यामुळे त्याला घ्यायला त्याची मावशी आली होती आणि तिच्या सोबत शिवाही होता. गोपाळ आणि रहीम नावाचे शिवाचे दोन मित्रही होते. या तिघांना पाहून भिमूला खूप आनंद झाला. लवकरच या साऱ्यांची गट्टी जमली. शिवाचं खेड्यातलं घर, घरासमोरची गाय, बैल इत्यादी बघून भिमू तर अगदी हरखून गेला. त्याला शेत नेहमीच आवडत असे. आता तर त्याला बागडायला हक्काचं शेत मिळालं. त्यानं शेताची आणि पीक-परिस्थितीची माहिती समजून घेतली. बैलगाडीत बसून फिरून आला आणि मग शाळेच्या, परीक्षेच्या गप्पा मारत चौघं शिवाच्या घराच्या वर माळवदावर गेले. *इलेक्ट्रिसिटीचा* झगमगाट नसताना तारकांनी गच्च भरलेलं आभाळ भिमूनं पहिल्यांदाच पाहिलं. दुसऱ्या दिवशी त्यांना शाळेत जायचं होतं.

३

पहाटेची वेळ. पक्ष्यांचा किलबिलाट. डोंगराच्या आडून उगवणारा सूर्य, बैलाच्या गळ्यातील घंटांचा नाद अशा प्रसन्न वातावरणामुळे भिमू हरखून गेला होता.

भिमूला हे सगळं नवीन होतं. निसर्गाच्या इतकं जवळ राहण्याचा त्याचा हा पहिलाच अनुभव. भिमूला अगदी आनंद झाला.

सगळे शाळेत जायला तयार झाले. रहीमसुद्धा दप्तर गळ्यात अडकवून हजर झाला होता. भिमूने चौकशी करायला सुरुवात केली. तो म्हणाला,

''लांब आहे का शाळा?''

''लांब? अरेऽ... बारा किलोमीटर दूर आहे शाळा...''

''लय लांबचा वेढा पडतो बघ!''

भिमू एकदम थक्कच झाला. म्हणाला,

''बारा किलोमीटर? म्हणजे जाऊन-येऊन चोवीस किलोमीटर झाले... एव्हढी पायपीट करता?''

''नाही! तसं जवळून एक रस्ता आहे, तरी पण चार-साडेचार किलोमीटर डोंगरातून चालावं लागतं... बघशीलच तू आता... आज तू आमच्या शाळेचा पाहुणा आहेस! *बोर्डा*वर तुझं नाव लिहिलंय आणि आमचे गुरुजी तुझं स्वागत करतील... चल...''

हे ऐकून भिमू अगदी



**माहिती मिळवा : एम. एस. स्वामीनाथन** - भारताच्या 'हरित क्रांती' मधील प्रमुख भूमिकेसाठी ते प्रसिद्ध आहेत.

वार्षिक देणगीदार - ➢ श्रीमती रंजना कुलकर्णी, सातारा ➢ श्री. अभिजित लिमये ➢ श्री. प्रशांत माने, पुणे ➢ श्री. विक्रम कामठे, पुणे ➢ श्री. मिलिंद बर्वे, पुणे ➢ सौ. सायली मुळ्ये

हरखूनच गेला!

चौघांनी डोंगराच्या दिशेने चालायला सुरुवात केली. हिरव्या कुरणातून, खडकातून पायवाट जात होती. त्यावरून हे चौघं चालत राहिले. चालता-चालता चढ लागला. डोंगरावर चढत गेल्यानंतर थोडा सपाटीचा प्रदेश. उंच-उंच झाडं आणि सुसाट वारा. भिमूने विचारलं,

''अरे, इकडून कुठून रस्ता आहे?''

''बघशीलच तू आता !... आणि आम्हाला दुसरा रस्ता पण नाही...''

लवकरच चारही मुलं दोन टेकड्यांच्या मधल्या आणि खिंडीसारख्या दिसणाऱ्या बोळकांडीत येऊन पोहोचली. तिथे तर कितीतरी सुसाट वारं होतं. ते थोडं पुढं गेले आणि भिमू एकदम ब्रेक लागल्यासारखा स्तब्ध उभा राहिला. पुढे दरीसारखा खोलगट भाग होता आणि त्यावर जुना दोरखंडाचा पूल बांधण्यात आला होता. पुलावर चालण्यासाठी अरुंद फळकूट होती आणि पुलाची लांबी अंदाजे दहा ते बारा फूट असेल. फळकुटीचे अगदी तुकडे झाले होते आणि वाऱ्या-पावसामुळे दोरखंड काळा पडला होता. वाऱ्यामुळे हा पूल हलतही होता. खरं सांगायचं, तर भिमूला अतिशय भीती वाटली.

''या पुलावरून जाता तुम्ही रोज?''

''नुसतं जात नाही... येतोसुद्धा! एकदा पलीकडे गेलो की, नंतर गाडीरस्ता आहे... मग शाळाच दिसायला लागते... चल... भिऊ नकोस...''

शिवानं भिमूला म्हटलं. पण तरीही भिमूची भीती गेली नाही. खाली धारदार खडकांचे सुळके दिसत होते. त्यातून थोडंसं पाणी खळाळत वाहत होतं आणि तो पूल तर वाऱ्याने हालतही होता. अशा पुलावरून पलीकडे जायचं? पण रहीमने भिमूला धीर दिला. तो म्हणाला,

''तू माझ्या मागून-मागून ये... शिवा तुझ्या मागं राहील... खाली बघू नकोस... सरळ बघायचं आणि हळूहळू चालायचं... घाबरायचं नाही...''

रहीम अगदी सहजपणे पुलावर चढला आणि पावलं टाकू लागला. छाती धडधडत असताना भिमूसुद्धा त्या पुलावरून चालायला लागला आणि त्याला ब्रह्मांड आठवलं; कारण पूल वाऱ्याने हालत होता आणि जर पूल तुटला तर आपण जगणार नाही, याची त्याला खात्री पटली. पण अशा परिस्थितीत आपले मित्र दररोज शाळेसाठी याच पुलावरून ये-जा करतात; याची त्याला आठवण झाली आणि तो सावरला. धैर्य एकवटून शांत मनाने दोरखंडाने बनवलेल्या त्या पुलावरून भिमूनं चालायला सुरुवात केली. आणि तो पलीकडे पोहोचला देखील. त्याच्या मित्रांनी त्याचं अभिनंदन केलं.

चौघं शाळेत पोहोचले. गुरुजींनी भिमूचं स्वागत केलं. त्याला वर्गात नेलं. तो त्यांचा आजचा 'प्रमुख पाहुणा' होता. त्या प्रेमानं भिमू अगदी भारावून गेला. त्याने आवडीने वर्गात बसून गुरुजींचं शिकवणं ऐकलं आणि नंतर एक छोटेखानी भाषण पण दिलं. शहरातल्या गंमती सांगितल्या. तो गुरुजींना म्हणाला,

''गुरुजी मुलांना रोज अवघड वाटेने, मोडकळीस आलेला पूल ओलांडून शाळेत यावं लागतं. त्यांच्यासाठी कायमस्वरूपी मोठा पूल का बांधत नाही?''

''आमचा तर प्रयत्न सुरू आहे! पण अजून आमच्या प्रयत्नांना यश आलं नाही. मात्र



वार्षिक देणगीदार - ➢ श्री. सचिन गाडगीळ, पुणे ➢ श्री. समीर गांधी, बेंगळुरु ➢ श्री. ओंकार चांदोरकर
➢ श्री. श्रीकृष्ण करंदीकर ➢ श्री. अजय फाटक, पुणे ➢ श्री. अरविंद परांजपे, पुणे

अशाही परिस्थितीत विद्यार्थी शाळा सोडत नाहीत याचा मला अभिमान आहे !... मुली मात्र शाळेत येऊ शकत नाहीत याची खंत वाटते.''

संध्याकाळी शाळा सुटली. चौघं परतीच्या वाटेवर निघाले.

४

चार-साडेचार किलोमीटर अंतर चालत गेल्यावर डोंगर दिसायला लागले आणि पुन्हा ती खिंड आलीच. चौघं पुलाजवळ येऊन थांबले. वारा सुटला होता, पूल डाव्या-उजव्या बाजूला हेलकावत होता. अशा परिस्थितीत पूल ओलांडायचा! क्षणभर का होईना भिमू घाबरला होता. आपल्या मनातल्या भीतीवर मात करण्यासाठी भिमूने हसून म्हटलं,

''या वेळेला आधी मी जाईन आणि नंतर तुम्ही तिघं या... पण रोज तुम्ही अशा वाटेने जाता-येता, शाळा बुडवत नाही, याबद्दल मी तुम्हाला *सॅल्यूट* करतो...''

भिमूनं खरंच तिघांना *सॅल्यूट* केला. तिघं हसले आणि भिमू त्या पुलावर चढला. डाव्या आणि उजव्या बाजूच्या दोरखंडाला धरून तुटक्या फळकुटीवर पाय ठेवत भिमू हळूहळू पलीकडे पोहोचला खरा; पण पुलातून कसलासा विचित्र आवाज येत होता. पूल वाऱ्याने हालत होता. पलीकडे उतरल्यानंतर तिघांना हात दाखवून भिमूने ओरडून म्हटलं,

''या आताऽऽऽ.''

त्याच्या ओरडण्याचा प्रतिध्वनी डोंगरातून दूरवर उमटला. शिवा, रहीम व गोपाळने एका मागोमाग एक रांग करून पुलावरून यायला सुरुवात केली. पुलाची लांबी अंदाजे बारा फूट होती. शिवा पुलाच्या मध्यावर येऊन पोहोचला होता. त्याच्या मागे रहीम होता आणि रहीमच्या मागे गोपाळ. तिघांना सराव होता. रोजचीच पायाखालची वाट! सराईतपणे पण हळूहळू ते तिघं पुढं-पुढं सरकत होते आणि अचानक दोरखंडाच्या पुलातून कसलासा भीतीदायक आवाज येऊ लागला. भिमूनं पाहिलं, तर पुलाच्या उजव्या बाजूला बांधण्यात आलेला दोरखंड 'कर्र... कट् कट्' असा आवाज करीत एकदम उलगडू लागला होता. दोर तुटायला लागला होता. कित्येक वर्षांपूर्वी तयार केलेला तो धोकादायक पूल वाऱ्या-पावसामुळे झिजला होता. दोरखंड कुजला होता आणि नेमका आज आणि आता, वजनामुळे तुटायला आला असावा. काय होतंय ते कळेपर्यंत, पूल एका दिशेनं कलंडायला लागला. एक मोठा धक्का बसून पुलावरील तिघं खाली तरी पडली असती किंवा पुलावर लटकत तरी राहिली असती.

आता घाबरून चालणार नव्हतं. भिमूच्या मनातील उरली-सुरली भीती कुठल्या कुठे पळून गेली. कसल्याशा अगम्य स्फूर्तीने प्रेरित होऊन त्याने दोरखंडाच्या दिशेने झेप घेतली आणि दोन्ही हातांनी दोरखंड घट्ट धरून ठेवला. एका खडकाला आपले दोनही पाय रोवून व अगदी जमिनीवर झोपून त्याने प्राणपणाने शक्ती लावली आणि ते ओझं पेलून धरलं. पुलाच्या मध्यभागी असलेला दोरखंड आता तुटून उलगडायला लागला होता. मनगटाएवढा जाड दोरखंड बोटाच्या जाडीइतकाच दिसायला लागला होता. भिमूनं आपल्या शक्तीनं दोरखंड ओढून धरला आणि त्यानं त्याही परिस्थितीत तिघांकडं पाहून शांतपणे म्हटलं,

''हळूहळू चालत राहा... खाली बघू नका... समोर

**माहिती मिळवा : राजेंद्रसिंह –** हे प्रसिद्ध जलसंरक्षक आणि पर्यावरणवादी असून ते 'वॉटरमॅन ऑफ इंडिया' म्हणून प्रसिद्ध आहेत.

वार्षिक देणगीदार - ➢ सौ. शशिकला उपाध्ये, चंद्रकला प्रकाशन, पुणे ➢ सौ. सुनिता जयंत देगावकर, पुणे ➢ श्री. अमित गद्रे, पुणे ➢ डॉ. गीतांजली व डॉ. सिद्धार्थ पटवर्धन ➢ सौ. नंदिता गाडगीळ, पुणे ➢ एक हितचिंतक, पुणे

बघा... आणि भिऊ नका... मी दोर घट्ट धरून ठेवला आहे...''



भिमूचे दोनही हात रक्ताळायला लागले. दात-ओठ खात प्रचंड शक्ती लावून त्यानं तो पूल पेलून धरला. शिवा भरभर पण गडबड न करता चालत राहिला आणि अलीकडे पोहोचला. लगेच त्याने आपलं दप्तर बाजूला टाकलं आणि तो भिमूच्या मदतीला आला. त्यानंही तो दोरखंड घट्ट धरला आणि पुलाला ओढ दिली. पुलाच्या मध्यभागी असलेला उजव्या बाजूचा दोरखंड आणखीन उलगडायला लागला होता आणि तिथून विचित्र कुरकुरण्याचा आवाज येतच राहिला. भिमूनं आता रहीमला चालण्याची सूचना केली. रहीमही गडबड न करता पटकन अलीकडे पोहोचला. त्यानंही दोरखंड घट्ट धरला. आता पुलाच्यामध्ये असलेला दोरखंड अगदी तुटायला आला होता. कोणत्याही क्षणी तो तुटून पूल कोसळला असता. गोपाळला परिस्थितीचा अंदाज आला. पण न डगमगता तोही चालत राहिला आणि अलीकडे येऊन पोहोचला.

मित्रहो! गोपाळ सुखरूप येऊन पोहोचला आणि त्याच क्षणी प्रचंड आवाज करत दोरखंड तुटला. पुलाचे दोन तुकडे होऊन दोनही तुकडे दोन बाजूला लटकू लागले. वाऱ्याने फडफडू लागले. काही क्षणांचा उशीर झाला असता तर?...

शिवाला अगदी रडू यायला लागलं. त्याने भिमूचे हात तपासले. त्यातून आता रक्त यायला लागलं होतं; पण तरीही तो हसत होता. आपण आपल्या मित्रांना वाचवलं याचा भिमूला अतिशय आनंद आणि अभिमान वाटत होता. गोपाळ म्हणाला,

''तुझ्या शक्तीमुळे आम्ही वाचलो...''

धावत चौघांनी घर गाठलं. शिवाचे वडील तालुक्याहून नुकतेच पोहोचले होते. घडलेल्या घटनेबद्दल ऐकून त्यांना धक्काच बसला. त्यांनी गावातल्या *नर्सला* बोलावून भिमूच्या तळहातांवर पट्टी बांधून घेतली आणि ते स्वतः पुलाची पाहणी करून आले.



वार्षिक देणगीदार - ➢ सौ. प्राची व श्री. शंतनू पटवर्धन ➢ ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि., पुणे
➢ श्री. विश्वासराव कचरे, तेलंगवाडी, ता. मोहोळ, जि. सोलापूर ➢ श्री. प्रमोद सी. पेठे, पुणे

नंतर त्यांनी पुन्हा तालुक्याला जाऊन तेथून भिमूच्या वडिलांना फोन केला आणि काय घडलं ते सांगितलं. भिमूचं कौतुक पण केलं. भिमूच्या वडिलांनी ही बातमी ताबडतोब संबंधित अधिकाऱ्यांना कळवली आणि तेही लगेच यायला निघाले.

**५**

इकडे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा पोलीसप्रमुख आपापल्या ताफ्यासह या दुर्लक्षित आणि दुर्गम असलेल्या गावी येऊन पोहोचले. त्यांनी त्या दरीची आणि तुटलेल्या पुलाची पाहणी केली. तिथे आता ‘लवकरच पक्का पूल होणार’ असं त्यांनी जाहीर केलं. जिल्हाधिकाऱ्यांनी माननीय पंतप्रधानांचं पत्रच दाखवलं. सरपंच आणि ग्रामस्थांनी त्यावर आभार मानले. सरकारदरबारी त्या पुलाचं काही जरी नाव ठेवलं गेलं तरी स्थानिक ग्रामस्थमंडळींनी ‘त्या न झालेल्या पुलाला’ आत्तापासूनच ‘भिमू-शक्तिमानचा पूल’ असं म्हणायला सुरुवात देखील केली.


विश्वास वाटत नाही? मग स्वतः डोंगरपूरला जाऊन पाहा. दोरखंडापासून बनवलेला तुटका पूल अजूनही तिथे लटकत असेल आणि वाऱ्याने फडफडत असेल. म्हणत असेल की, धैर्य आणि कर्तव्य भावनेतून संकटावर मात करता येते, इच्छा मात्र पाहिजे! ‘जीव मुठीत धरून’ शाळेला जाणाऱ्या मुलांची शौर्यगाथा हा तुटका पूल आपल्या फडफडीतून सांगत असेल. तुम्ही ऐकलं मात्र पाहिजे. आणि गेलात, तर आता तरी पक्का पूल बांधून झालेला आहे की नाही हे पाहून या; कारण कठीण परिस्थितीतसुद्धा शिक्षण न सोडणाऱ्या मुलांना जाण्या-येण्याची सुरक्षित साधनं आपल्यालाच मिळवून द्यायची आहेत. हो ना?...

***

**– भारत सासणे**
२०४, लक्ष्मी एन्क्लेव्ह, गणेशखिंड रस्ता,
मॉडेल कॉलनीजवळ,
शिवाजीनगर, पुणे 411016

**नक्की ऐका**
**कथा : एका कवितेची गोष्ट**
**लेखिका : जयश्री काटीकर**
**वाचनस्वर : नीरज वैद्य**

(पूर्वप्रसिद्धी – सुबोध ग्रामीण द्वैमासिक सौर चैत्र-वैशाख शके १९३९/मार्च २०१७)




## ।। विशेष आनंद वार्ता ।।



ज्येष्ठ लेखिका **वाचस्पती नलिनी गुजराथी लिखित** व **ज्ञान प्रबोधिनी प्रकाशित ‘पंख फुलवू या प्रतिभेचे’** या पुस्तकास महाराष्ट्र साहित्य परिषदेचा **‘शैक्षणिक विभागात उत्कृष्ट पुस्तक’ म्हणून पुरस्कार जाहीर** झाला आहे.

**छात्र प्रबोधन परिवारातर्फे वाचस्पती नलिनी गुजराथी यांचे मन:पूर्वक अभिनंदन!!**

**ज्ञान प्रबोधिनी प्रकाशित – पंख फुलवू या प्रतिभेचे**
**पृष्ठसंख्या १९२, किंमत : रु. २५०/–**

पुस्तकाचा संक्षिप्त परिचय पाहाण्यासाठी व ऑनलाइन खरेदीसाठी QR **कोड** स्कॅन करा.

(या पुस्तकाची इंग्रजी आवृत्ती उपलब्ध. हिंदी व गुजराथी भाषेतील आवृत्तीचे काम सुरू...)

**माहिती मिळवा : जादव पायेंग –** हे पर्यावरणवादी कार्यकर्ते व वन कर्मचारी असून ‘भारताचे वनपुरुष’ म्हणून प्रसिद्ध आहेत.

वार्षिक देणगीदार - ➢ श्री. कौस्तुभ माणिकराम हळबे ➢ श्री. राजेंद्र जाधव, पुणे ➢ श्री. जगजीत कुलकर्णी, चिंचवड, पुणे ➢ श्री. हृषिकेश भागवत, बंगळुरु ➢ डॉ. जयेश रहाळकर, पुणे ➢ श्री. सौमित्र जोशी, पुणे

घेऊ प्रेरणा निसर्गापासून! (लेखांक २)

# किमया चोचीची!

– डॉ. नंदा हरम



आकृती १ (खंड्या पक्षी)

वेद पक्षी–निरीक्षणाला जाऊन आल्यापासून फारच खुशीत होता. त्याला बाबांनी विचारलं, ''वेद, एवढा कसला आनंद झाला आहे, जणू एखादं कोडं सुटावं...''

वेद म्हणाला, ''बाबा, अहो, खरंच एका प्रश्नाचं उत्तर मिळालं, म्हणून मी खुशीत आहे.''

बाबा म्हणाले, ''तो कोणता?''


वेद उत्तरला, ''काल पक्षी–निरीक्षणाच्या वेळी खंड्या पक्षी (आकृती १ पाहा) बघायला मिळाला. नुसता बघायला नाही, तर तळ्यात त्याने सूर मारून मासा पकडला. बाबा, डोळ्याचं पातं लवतं ना लवतं इतक्या क्षणार्धात खंड्याने, पाण्यात सूर मारला आणि मासा पकडला. आम्ही अगदी चकित झालो.''

बाबा म्हणाले, ''अरे वा! अगदी दुर्मीळ क्षणाचे साक्षीदार झालात तुम्ही! पण, खंड्या पक्ष्याला हे कसं शक्य होतं, ते कळलं का?''

''सरांनी फक्त 'चोच' असा 'क्ल्यू' दिला होता. त्याचंच उत्तर मला सापडलं,'' आनंदाने वेद सांगू लागला.

बाबा वेदची परीक्षा घेत म्हणाले, ''मला सांगशील समजावून?'' वेदला बरंच वाटलं. तो म्हणाला, ''बाबा, त्याच्या चोचीचा आकार निर्णायक ठरतो. खंड्या पक्ष्याची चोच लांब, निमुळती, कोनासारखी असते.'' मध्येच थांबवत बाबांनी विचारलं, ''त्याचा काय एवढा उपयोग?'' वेद म्हणाला, ''खंड्याच्या लांब, निमुळत्या कोनासारख्या चोचीमुळे चोच पाण्यात शिरल्यावर पाण्यात संपीडन तरंग (Compression Wave) निर्माण होत नाही, पाणी उसळत नाही. (आकृती क्र. २ पाहा.) सहजपणे चोच पाण्यात शिरते आणि माशाला कळण्यापूर्वीच तो पकडला जातो. खरं म्हणजे कमी अवरोध असलेल्या हवेतून जास्त अवरोध असलेल्या पाण्यात चोचीचा शिरकाव होतो. परंतु टोकदार, निमुळत्या चोचीमुळे जास्त अवरोध निर्माण होत नाही. जर चोच जाड, रुंद, गोलाकार असती, तर पाण्यात तरंग निर्माण झाले असते (आकृती क्र. २ अ पाहा) आणि मासा पळून गेला असता.''

बाबा टाळ्या वाजवून म्हणाले, ''व्वा, वेद! अगदी नेमक्या शब्दात सांगितलंस तू! खरंच कारण कळलं तुला.''




अ –संपीडन तरंग

पुढे बाबा म्हणाले, ''वेद, यावरून एक गोष्ट आठवली मला. या खंड्या पक्ष्याच्या निरीक्षणाचा जपानी *इंजिनिअर* 'इजी नकात्सू' याला एक मोठ्ठा प्रश्न सोडवायला उपयोग झाला.''

वेद गोंधळून म्हणाला, ''निरीक्षण... प्रश्न.... काही कळलं नाही. स्पष्ट सांगा ना... मला कळेल असं...''

बाबा म्हणाले, ''वेद, तुला बुलेट ट्रेन माहिती आहे ना?''


वेद लगेच म्हणाला, ''हो... आता आपल्याकडे पण होणार आहे ना?''

बाबा म्हणाले, ''हो... पण मी जपानमधील बुलेट *ट्रेनच्या* विषयी सांगतो आहे. बुलेट *ट्रेनचा* सरासरी वेग ताशी २५०-३०० किमी असतो. सुरुवातीला वेद, *प्रॉब्लेम* असा होता की, जेव्हा ही बुलेट *ट्रेन* भुयारातून बाहेर पडायची, तेव्हा त्याचा इतका मोठा आवाज यायचा की, ४०० मीटर अंतरावर राहणारे लोकंही आवाजाने हैराण होत. ते त्याविषयी तक्रार करू लागले.''

वेद मध्येच थांबवत म्हणाला, ''हा एवढा मोठा आवाज कशामुळे यायचा, बाबा?''

''चांगला प्रश्न विचारलास, वेद! जेव्हा *ट्रेन*

हवेच्या दाबातील बदल




आकृती ३

भुयारात शिरायची, तेव्हा हवा दाबली जायची (आकृती क्र. ३ पाहा) हवेच्या अवरोधात बदल व्हायचा. आकृतीत दाखविल्याप्रमाणे *ट्रेन* जसजशी पुढे सरकेल, त्याप्रमाणे हवेच्या दाबात बदल व्हायचा. सुरुवातीला *ट्रेनच्या* पुढच्या भागाचा आकार वेगळा होता. (आकृती क्र. ४अ पाहा)

वेद म्हणाला, ''म्हणजे बाबा... खंड्या जेव्हा पाण्यात सूर मारतो, तेव्हा त्याच्या चोचीच्या आकाराचा त्याला फायदा होतो. तोच फायदा मिळवायचा प्रयत्न या *इंजिनिअर* काकांनी केला का?''

''अगदी बरोबर! त्यांनी *ट्रेनचा* पुढचा भाग खंड्याच्या चोचीच्या आकाराप्रमाणे बदलला.




आकृती ४



**माहिती मिळवा : मारिमुथु योगनाथन** – सुमारे १,२०,००० रोपे लावण्याच्या कार्यामुळे 'द ट्री मॅन ऑफ इंडिया' म्हणून प्रसिद्ध.

वार्षिक देणगीदार - ➢ श्री. सागर सुभाष सुराणा, पुणे ➢ श्री. नारायण जांगळे, निगडी, पुणे ➢ श्री. धनंजय कराडे, सासवड ➢ श्री. रघुनाथ शंकर आवटे, पुणे ➢ श्री. मयुरेश सोहनी, पुणे ➢ श्री. अनिल रिसवूड, पुणे

(आकृती क्र. ४ ब पाहा)'' बाबांनी सांगितलं.

''मग तो आवाज थांबला?'' वेदनं उत्सुकतेनं विचारलं.

''अगदी पूर्ण थांबला नाही; पण जी स्टँण्डर्ड आवाजाची पातळी असते ना... ७० डेसिबल, ती तिने गाठली आणि वेद या व्यतिरिक्त अनेक फायदे झाले,'' बाबा सांगू लागले.

''ते कोणते?'' वेदनं विचारलं.

''हवेचा अवरोध ३०% नी कमी झाल्यामुळे ऊर्जेची बचत झाली. जवळजवळ १३% ऊर्जेची बचत झाली. *ट्रेनच्या* वेगात वाढ होऊ शकली. ही *ट्रेन* ५०० *सीरिजची* होती. तिचा तेव्हाचा कमाल वेग ताशी ३०० किमी. होता. ही गोष्ट आहे. २२ मार्च १९९७ ची. वेग वाढल्यामुळे प्रवासाचा कालावधी कमी झाला.''

''बाबा... पण केवळ खंड्या पक्ष्याकडे बघून लगेच त्याने बदल घडवला का?'' वेदनं उत्सुकतेनं विचारलं.

बाबा हसून म्हणाले, ''निश्चितच नाही. त्याआधी त्यांनी वेगवेगळे प्रयोग केले. संगणकावर सदृश्यीकरण *(सिम्युलेशन)* करून पाहिलं. बरं, वेद, तुझ्या खंड्या पक्ष्याच्या निरीक्षणावरून मी तुला ही गोष्ट सांगितली; पण आणखी एक महत्त्वाची गोष्ट आहे.''



आकृती ५




''ती कोणती बाबा?''

''*ट्रेनच्या* डोक्यावर *पेंटोग्राफ* असतो ना, येतोय का लक्षात?'' (आकृती क्र. ५ पाहा) या *ट्रेनचा* वेग जास्त असल्यामुळे हवेचा भोवरा तयार व्हायचा. (आकृती क्र. ६ पाहा) यामुळे प्रचंड आवाज यायचा. हा प्रश्न इजि नकात्सूने प्रथम सोडवला.''

''तो कसा?''

''हा प्रश्न सोडवायलाही एका पक्ष्याचा उपयोग झाला. त्याच्या पंखांच्या रचनेचा त्याने उपयोग करून घेतला. हा पक्षी कोणता असेल हे तू शोधून काढ.''

''हो, नक्की! बाबा, म्हणजे निसर्ग आपला गुरूच आहे ना?''

''त्यात शंकाच नाही!'' बाबा हसून म्हणाले.

***

– डॉ. नंदा हरम
nandaharm2012@gmail.com

**कृतिपाठ**

१) ७० *डेसिबलपेक्षा* जास्त म्हणजे किती *डेसिबलपर्यंत* आपण आवाज सहन करू शकतो?

२) आपल्याकडे गणेशोत्सवात आणि दिवाळीत किती *डेसिबल* आवाजाची नोंद होते? तुम्हाला माहीत आहे का? त्याविषयी जाणून घ्या.

३) *पेंटोग्राफची* रचना कोणत्या पक्ष्याच्या पंखावरून इजी नकात्सूंना सुचली? शोधून काढा बरं... त्या रचनेचा फायदा काय?

शिक्षक आम्हा असे लाभले, ज्यांनी आमुचे हित जाणले। अशक्य जेथे शक्य बनले, तीच आमुची शाळा।।

वार्षिक देणगीदार - ➢ श्री. अमोल अशोक बोरोले, पुणे ➢ श्री. शिरीष मुळे, छ. संभाजीनगर ➢ श्री. दिनेश सोनसळे, पुणे
➢ श्री. अमित गाडगीळ, पुणे ➢ श्री. प्रियव्रत देशपांडे, चेन्नई ➢ श्री. विनोद कुलकर्णी, पुणे

# छात्र प्रबोधनद्वारा कुमारांसाठी नव्याने प्रकाशित झालेली पुस्तके

**मासिकातील साहित्यातून आजअखेर ६१ पुस्तके प्रकाशित!**

प्रत्यक्ष खरेदीसाठी – छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे – ३० ☎ ०२०– २४२०७१७४/१७५

ऑनलाइन खरेदीसाठी – jpprakashane.org व amazon.in या संकेतस्थळांवर उपलब्ध

jpprakashane.org वरून खरेदीसाठी

ॲमेझॉनवरून खरेदीसाठी


## आस्वाद बहुरंगी साहित्याचा - लेखिका : शैलजा देशमुख



वि. स. खांडेकर, पु. ल. देशपांडे, साने गुरुजी, आचार्य प्रल्हाद केशव अत्रे, गो. नी. दांडेकर, व्यंकटेश माडगूळकर, शांताबाई शेळके, अनिल अवचट ह्या साहित्यिकांनी आपापल्या खास शैलीत वेगवेगळ्या प्रकारांचे खूप सारे गद्य लेखन केले आहे. या आठ साहित्यिकांच्या विपुल साहित्याचा रसाळ मागोवा या पुस्तकात घेतलेला आहे.

**पृष्ठसंख्या : ९६**
**किंमत : रु. १२०**

## काव्यगंधाची रसयात्रा - लेखिका : शैलजा देशमुख



**पृष्ठसंख्या : १२०**
**किंमत : रु. १२०**


प्रत्येक कवीचं भावविश्व, अनुभवविश्व, व्यक्त होतानाचा आशय, भाषाशैली जरी वेगळी असली, तरी काही समान विषयांवर व्यक्त होताना वेगवेगळ्या कवींना त्यातले कोणकोणते पैलू भावतात, भिडतात आणि त्याची 'कविता' होते; हे पाहणे देखील मनोहारी असते. हाच धागा पकडून प्रस्तुत पुस्तकात 'पाऊस', 'फुले', 'शिशिर ऋतू', 'आई', 'शाळा', 'स्वातंत्र्य' इ. निवडक आठ विषयांवर वेगवेगळ्या कवी/कवयित्रींनी लिहिलेल्या कवितांचा रसास्वादाच्या अंगाने वेध घेतला आहे.

## मैत्री आयुर्वेदाशी - लेखक : वैद्य प्रयाग सेठिया



ज्यांना 'आयुर्वेद म्हणजे काय?' हे जाणून घ्यायचे आहे, 'आयुर्वेदाशी मैत्री' करायची आहे, हे पुस्तक त्या सर्वांसाठी! आयुर्वेद-शास्त्राच्या अथांग सागराची ड्रोनने दाखवलेली झलक म्हणजे जणू काही हे पुस्तक!

**पृष्ठसंख्या : ७२ किंमत : रु. १००/-**



## ६ पानी ४० पुस्तकांचा 'कथा-कविता संच' उपलब्ध

**६२ लेखकांच्या ८० कथा आणि ३३ कवींच्या ४० कविता, १३ पुस्तकांचा परिचय!**

- **त्या-त्या पानावर अवघड शब्दांचे अर्थ**
- **कथेच्या शेवटी आकलनावर आधारित प्रश्न**

**सवलत मूल्य रु. ६००/- (मूळ किंमत रु. १०००/-) + वितरण खर्च**

**१० पुस्तकांच्या कथा-कविता संचाचे सवलत मूल्य रु. २०० (मूळ किंमत रु. २५०/-) + वितरण खर्च**

## नवीन आवृत्ती



आवृत्ती – द्वितीय
पृष्ठसंख्या : ११२
किंमत : रु. १३०/-

### भावनांच्या प्रांगणात

**संपादन : प्रज्ञा कुलकर्णी**

मुलांमधील सकारात्मक भावनांची जोपासना करण्यासाठी कुमारांनी, तसेच पालक आणि शिक्षकांनी आवर्जून वाचावे, असे हे पुस्तक!

### चला प्रकल्प करू या!

**संपादन : प्रा. विवेक पोंक्षे, नचिकेत नित्सुरे**

प्रकल्प कसे करावेत? प्रकल्पांसाठी लागणारी कौशल्ये, प्रकल्पांचे विविध प्रकार व त्यांची वैशिष्ट्ये यांबाबत माहिती देणारे पुस्तक!



आवृत्ती – द्वितीय
पृष्ठसंख्या : २००
किंमत : रु. २५०/-

## पुनर्मुद्रणे

१. **आम्ही असे घडलो** (प्रेरणादायी लेखसंग्रह) प्रथम आवृत्ती – तृतीय पुनर्मुद्रण, पृष्ठसंख्या १३६, किंमत रु. १६०/-
२. **आयुष्यातील वादळलाटा** (प्रेरणादायी लेखसंग्रह) द्वितीय आवृत्ती – चतुर्थ पुनर्मुद्रण, पृष्ठसंख्या १०४, किंमत रु. १२०/-
३. **कथा इस्रोची** (प्रेरणादायी) तृतीय आवृत्ती – पहिले पुनर्मुद्रण, पृष्ठसंख्या १०४, किंमत रु. १२०/-

सौर ज्येष्ठ, शके १९४५/जून२०२३ पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
प्रकाशन दिनांक : सौर ११ ज्येष्ठ, शके १९४५/१ जून २०२३
पंजीकरण क्रमांक (RNI NO.) MAHMAR /2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (SDM/Pune/SR/139/2017)
टपालाने सवलतीच्या दरात पाठविण्याचा परवाना क्रमांक : PCW/050/2021-2023
Date of posting : On 1st day of every month, At the Post office S. P. college, Pune - 30. Date of publication : 1-6-2023



कुमारांच्या कुंचल्यातून साकारलेले चित्र!  – कु. श्रावणी जोशी (इ. १२ वी), मालवण, जि. सिंधुदुर्ग

सभासदांनी आपले व्हॉटस्‌ॲप संपर्क क्रमांक कळवले नसल्यास ९०१११६१४४५ या भ्रमणभाषवर लवकरात लवकर कळवावे. म्हणजे सभासदांशी वेळोवेळी संपर्क साधता येईल. स्पर्धा, उपक्रम, व्याख्याने, नवीन प्रकाशने यांची माहिती पोहाचवता येईल.

छात्र प्रबोधद्वारा प्रकाशित **दिनदर्शिकेतील जून महिन्याचे पान** पाहाण्यासाठी क्यू आर कोड स्कॅन करा!

**सौर दिनदर्शिकेचा वापर जरूर करा.**

**सौर दिनदर्शिका शके १९४५**

| | सौर ज्येष्ठ आषाढ | जून २०२३ |
|---|---|---|
| गु. | ज्ये.११ | 1 |
| शु. | १२ | 2 |
| श. | १३ | 3 |
| र. | १४ | 4 |
| सो. | १५ | 5 |
| मं. | १६ | 6 |
| बु. | १७ | 7 |
| गु. | १८ | 8 |
| शु. | १९ | 9 |
| श. | २० | 10 |
| र. | २१ | 11 |
| सो. | २२ | 12 |
| मं. | २३ | 13 |
| बु. | २४ | 14 |
| गु. | २५ | 15 |
| शु. | २६ | 16 |
| श. | २७ | 17 |
| र. | २८ | 18 |
| सो. | २९ | 19 |
| मं. | ३० | 20 |
| बु. | ३१ | 21 |
| गु. | आ. १ | 22 |
| शु. | २ | 23 |
| श. | ३ | 24 |
| र. | ४ | 25 |
| सो. | ५ | 26 |
| मं. | ६ | 27 |
| बु. | ७ | 28 |
| गु. | ८ | 29 |
| शु. | ९ | 30 |

**संपर्क पत्ता :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (020) 24207 174/175
www.chhatraprabodhan.org
**इ–मेल :** chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

**वार्षिक वर्गणी : ₹ २५०/–**
ऑनलाइन वर्गणी भरण्यासाठी व पुस्तक खरेदीसाठी :
**www.jpprakashane.org**

प्रिय पोस्टमन,

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करत आहात. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना!

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (→) पत्त्यावर द्यावे, ही आग्रहाची, प्रेमळ विनंती.

तुमचा–संपादक, छात्र प्रबोधन